


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६६२. वा | गुरुवार | दि. २५ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात लोकशाही दिनही ठरला दीन...

## दोन महिन्यांपासून तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई नाही

## एसडीओ कार्यालयाकडून ही बनवाबनवी सुरूच...

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. परंतु नोकरशाहीने या लोकशाहीची कशी वासलात लावली आहे, याचा प्रत्यय बुलढाणा महसूल विभागात सध्या येत आहे. बुलढाण्याचे तह-सीलदार रुपेश खंडारे व महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या गैरकारभारासंदर्भात लोकशाहीदिनी तक्रार करून दोन महिने लोटले, तरी अद्यापही यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात न आल्यामुळे हा लोकशाही दिन नसून, भारताची लोकशाही दीन झालेली, असे भासू लागले आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने जिल्ह्याच्या महसूल विभागात जो काही भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्यासंदर्भात सातत्याने वृत्तमालिकेद्वारे माहिती प्रकाशित करण्यात येत आहे. या भ्रष्टाचारासंदर्भात सातत्याने अधिकाऱ्यांना माहिती देण्यात येत आहे व भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र, सध्याच्या स्थितीत महसूल विभाग हा भ्रष्टाचाऱ्यांसाठी एक सुरक्षित नंदनवन बनल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. कारण महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे आणि त्यांना त्यांच्या भ्रष्टाचारात समर्थ साथ देणारे तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करून देखील एकही अधिकारी त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची हिम्मत दाखवत नसल्याचे एव्हाना स्पष्ट झालेले आहे. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे दिसल्यानंतर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने दि. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी लोकशाहीदिनात तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीत म्हटले आहे की, जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) अंतर्गत बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे यांना केवळ सनद देण्याचे अधिकार असतानाही त्यांनी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांना वाचवण्याच्या उद्देशाने टेकाळे यांच्यासह त्यांच्या पत्नी ज्योती टेकाळे, भाऊ दीपक टेकाळे आणि आणखी चार लोकांच्या नावे मौजे जांभरून परिसराच्या गट नं. १३६ मधील २.८२ हेक्टर आर. शेत जमीन बेकायदेशीररि एनएपी३४ चे अकृषक ले-आऊट करून दिले. या माध्यमातून रूपेश खंडारे यांनी मोठ्या प्रमाणात नियमबाह्य काम केलेले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. आता या तक्रारीला तब्बल २ महिन्यांपेक्षा अधिकचा कालावधी उलटून गेला आहे. लोकशाहीदिनी तक्रार केल्यानंतर त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही व्हावी, अशी कोणत्याही सामान्य भारतीय नागरिकाची अपेक्षा असते.




परंतु नोकरशाहीने भारतातील लोकशाहीला किती दीन करून टाकले आहे, या प्रकरणात दिसून येते. कारण अद्यापपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला यासंदर्भात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कोणताही पत्रव्यवहार करण्यात आला आहे. शिवाय यासंदर्भात नेमकी काय कार्यवाही सुरू आहे? चौकशी सुरू झाली का? चौकशी कुठवर आली आहे? चौकशीचा अहवाल तयार झाला आहे का? तयार झाला असल्यास त्यासंदर्भात कुठल्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे? दोषींवर काय कारवाई केली जाणार? असल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर तक्रारदारास प्राप्त झालेले नाही. एकीकडे अधिकारी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करीत नाहीत. महसूल आयुक्तांकडून आलेल्या स्मरणपत्राला देखील केराची टोपली दाखवतात. सातत्याने भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करीत असतात.

उर्वरित पान ८ वर

---

# बुलडाणा जिल्ह्यातील तोतया पोलीस अमरावती खऱ्या पोलीसांच्या ताब्यात...

## बुलडाणा,बीड,जालना,संभाजी नगर सह इतर ठिकाणी गुन्हे दाखल...

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात अनेक ठिकाणी तोतया पोलीस बनून अनेकांची फसवणूक झाल्याच्या या आधी घटना घटना घडल्या.. मात्र अशाच घटनेत एक तोतया चा बनावट पणाचा डावं फसला आणि सिटी कोतवाली पोलिसांच्या सतर्कतेने तो तोतया पोलीस खऱ्या पोलिसांच्या हाती लागला..धक्कादायक घटना घडली २४ जानेवारी च्या भरदुपारी चित्रा चौकात असलेल्या फुटाना दुकाना जवळ...... ग्रामीण भागात राहणारे वृद्ध ताराचंद शामराव पाचपोर यांना पोटाचा आजार असल्यामुळे त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात तज्ञ डॉ ला विचारणा करिता दाखल झाले.. शहरात येत आहे म्हणून काही साहित्याची खरेदी करण्यासाठी त्यांनी आधी बँकेतून २५ हजार रुपये काढले.. एवढ्यात दुपारी ताराचंद पाचपोर हे चित्रा चौकात असलेल्या फुटाना दुकानात गेले असता त्याच वेळी अज्ञात इसम दाखल होऊन मी पोलीस आहे तुमच्या खिशात ड्रग्स गांजा आहे का असे म्हणून खिशाची तपासणी केली.. पाचपोर यांच्या खिशातील २५ हजार काढून त्यांचे हात पकडून सोबत घेऊन गेले.. काहीच अंतर गेल्यानंतर तेथून पळ काढला.. एवढ्यात तोतया पोलीस असल्याचे समजताच पाचपोर यांनी आरडा ओरड केली आणि लगेच याची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलीस निरीक्षक विजयकुमार वाकसे यांनी तात्काळ आपले पोलीस पथक सरोज चौकात रवाना केलें.. त्याच वर्णनाचा इसम पळून जाताना लगेच काहीच वेळात त्या तोतया पोलिसाला अखेर बेड्या ठोकून सिटी कोतवाली पोलिसांनी उत्तम कामगिरी बजावली... या प्रकरणात आता त्या तोतया पोलिसांची कसून विच-



ारणा करण्यास सुरुवात झाली असून त्याच्यावर इतर जिल्ह्यातही विरुद्ध गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली अमरावती पोलिसात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.. तोतया पोलीस बनून त्या भामट्याने ताराचंद पाचपोर याची कशा पद्धतीने फसवणूक केली हे सर्व तेथे लागलेल्या सिसी टीव्ही कॅमेरात कैद झाले आहे.. सूत्रांकडून माहिती मिळाली असून हा तोतया पोलिस बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथील असून हल्ली मुक्काम जालना येथे वास्तव्यास आहे या आरोपीला २ ते ३ मुले व २ ते ३ मुली असून एक मुलगा डॉक्टर असल्याची माहिती मिळाली

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या मेळाव्यात योजनांची माहिती

**जनसंचलन/बुलडाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी मेळावा पार पडला. मेळावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात मंगळवारी, दि. २३ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आला. महामंडळामार्फत मातंग व तत्सम जातीतील कुटुंबाची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत, तसेच त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महामंडळाने नाविण्यपूर्ण योजना सुरु केल्या आहेत. महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचण्याकरीता योजनांचा प्रचार व प्रसार करण्याकरीता मेळावा घेण्यात आला. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनिष सांगळे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे आमदार संजय गायकवाड, महामंडळाचे महाव्यवस्थापक अनिल म्हस्के, महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक अ. ब. साळुंके, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त अनिता राठोड, महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे उपस्थित होते. मेळाव्यानिमित्त शाहीर केशव डाखोरे वाशिमकर यांचा अण्णाभाऊंच्या जीवनावर शाहीरी कार्यक्रम झाला. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक यांनी महामंडळाच्या नाविण्यापूर्ण योजनांबाबत मार्गदर्शन केले. आमदार गायकवाड यांनी मातंग समाजातील लाभार्थीनी योजनांचा लाभ घ्यावा, तसेच नाविण्यपूर्ण योजना लवकरच ऑनलाईन करण्यात येणार असलयाचे सांगितले. आमदार गायकवाड यांच्या हस्ते विविध योजनांतील धनादेश वितरीत करण्यात आले. तसेच थेट कर्ज योजनेचे मंजुरी आदेश वाटप करण्यात आले. श्री. गाभणे यांनी प्रास्ताविक केले. वैशाली तायडे यांनी सूत्रसंचालन केले. विजय तायडे यांनी आभार मानले.

# बैलगाडा शर्यतीतून एकोपा वाढीस लागावा- जयश्रीताई शेळके

## चांगेफळ खुर्द येथील जोड छकडा शर्यतीचा शुभारंभ...

**जनसंचलन/ संग्रामपूर**



बैलगाडा शर्यत ही प्राचीन संस्कृती आणि पारंपरिक प्रथेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून ओळखली जाते.ग्रामीण अर्थकारणाला गती देण्याचे काम यामधून होते. वेगवेगळ्या गावांतील बैलजोडी स्पर्धेत उतरत असल्यामुळे एकोपा वाढीस लागतो, असे प्रतिपादन दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्षा तथा काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्रीताई शेळके यांनी केले. तालुक्यातील चांगेफळ येथे २४ जानेवारी रोजी जोड छकडा शर्यतीचा त्यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला पोलीस पाटील मंगला अवचार, माजी सरपंच विश्वास पाटील, बाजार समिती संचालक भाऊराव पाटील, दत्ता पाटील, राजेश्वर देशमुख, दत्ता इंगळे, नमन इंगळे, आकाश बोरसे, दादाराव धंदर, मनोज वाघ, अशोक सरदार, मधुकर पाटील आदींची उपस्थिती होती. तर निवाना, रुधाना, वकाना, सावळा, मडाखेड, चांगेफळ, चाकोती, भेंडवळ, टूनकी, बावनबीर, शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद यासह तेल्हारा, अकोला येथूनही नागरिक उपस्थित होते. पुढे बोलतांना जयश्रीताई शेळके म्हणाल्या, ग्रामीण भागातील बैलगाडा शर्यत लोकप्रिय आहेत. उच्चभ्रूंच्या घोड्याच्या शर्यतींचे जितके वेड असते तितकेच वेड बैलगाडा शर्यतींचे आहे. महाराष्ट्रासोबत कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, गुजरात, पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये बैलगाडा शर्यतींचा थरार रंगतो. शेतीची कामे संपली की, मनोरंजनाचे, खेळीमेळी आणि उत्साह कायम ठेवण्याचे साधन म्हणून बैलगाडा शर्यतीकडे पाहिले जाते. धार्मिक यात्रा, जत्रा, मोठे कार्यक्रम किंवा ऊरुस यामध्ये बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात येते. मध्यंतरी बरीच वर्षे बैलगाडी शर्यतीवर बंदी होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी उठवल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्ह्यातील उत्कृष्ठ क्रीडापटू, दिव्यांग गुणवंत खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांचे कार्य, योगदानाचे मुल्यमापन होवून त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू (पुरुष व महिला), दिव्यांग गुणवंत खेळाडू यांना जिल्हा क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात येते. यासाठी दि. २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करावे लागणार आहे. यावर्षी प्रजासत्ताक दिनी जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण करण्यात येणार होते. परंतु अपरिहार्य कारणामुळे दि. २६ जानेवारी २०२४ रोजी जिल्हा क्रीडा पुरस्कार वितरीत केले जाणार नाही. त्यामुळे पात्र खेळाडू व क्रीडा मार्गदर्शकांनी परिपूर्ण प्रस्ताव दि. २० फेब्रुवारी २०२४ पर्यंत सादर करावे. सदर पुरस्कार महाराष्ट्र दिनी दि. १ मे २०२४ रोजी वितरीत करण्यात येतील. या पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख १० हजार रूपये असे आहे. त्या अनुषंगाने सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असावे. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्षे महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असावे. त्याने वयाची ३० वीं पुर्ण केली असणे आवश्यक आहे. गुणांकनाकरीता त्या जिल्ह्यातील खेळाडूंचीच कामगिरी ग्राह्य धरली जाईल. दिव्यांग खेळाडू व गुणवंत खेळाडू पुरस्कार वर्षासह लगतपूर्व ५ वर्षापैकी २ वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व केले असावे. एका जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. एकदा एका खेळामध्ये किंवा एका प्रवर्गामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळण्यास पात्र असणार नाही. पुरस्कार वर्षाची गणना १ जुलै ते ३० जुन अशी राहील. तीनही पुरस्काराकरीता अर्जासोबत सादर करण्यात आलेले प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे पुन्हा सादर करु नये. अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे व प्रमाणपत्र सत्य असल्याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडून ॲफीडीवेट करुन घ्यावे. विहीत नमुन्यातील अर्ज आणि पुरस्काराच्या अटी व शर्ती आणि अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथून अर्ज प्राप्त करुन घ्यावे. परिपुर्ण अर्ज सिल बंद लिफाफ्यामध्ये दि.२० फेब्रुवारी २०२४ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानकर यांनी केले आहे

# मेहकर येथे आजपासून कृषि महोत्सव,प्रदर्शनी...



**जनसंचलन/मेहकर**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त कृषि विभागातर्फे मेहकर येथे कृषि महोत्सव आणि कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवार, दि. २५ जानेवारी २०२४ पासून दि. २९ जानेवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे. मेहकर येथील राजश्री आयुर्वेदिक महाविद्यालयासमोरील प्रांगणात ही प्रदर्शनी सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. कृषि प्रदर्शनीचे उद्घाटन गुरूवारी दुपारी २ वाजता पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खासदार प्रतापराव जाधव अध्यक्षस्थानी राहतील. आमदार संजय रायमुलकर स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार रक्षा खडसे, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, ॲड. आकाश फुंडकर, संजय गायकवाड, श्वेता महाले, राजेश एकडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, विभागीय कृषि सहसंचालक किसन मुळे उपस्थित राहणार आहेत. योवळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे, मेहकर बाजार समितीचे सभापती माधव जाधव, लोणार बाजार समितीचे सभापती बळीराम मापारी, मेहकर बाजार समितीचे उपसभापती विलास मेहरुत, लोणार बाजार समितीचे उपसभापती जगाराव आडे यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूल मध्ये वसुधैव कुटुंबचे दर्शन...

## संपूर्ण भारत नव्हे तर जग आपले कुटुंब - डी.एस.लहाने

जनसंचलन/बुलढाणा

दि. १९ ते २० जानेवारी २०२४ दरम्यान दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन, वसुधैव कुटुंबकम या थीम वर आयोजित करण्यात आली होती. वार्षिक स्नेहसंमेलनाच उद्देश विध्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत विविध कृतियुक्त शिक्षण देणे. वार्षिक स्नेहसंमेलन शालेय जीवनामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत असते. कृतियुक्त शिक्षण विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणार्थ राहते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या विविध गुणांना पैलू पाडण्याचे काम शाळा करत असते. शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन दरम्यान वर्ग नर्सरी ते १२ च्या एक हजार पन्नास विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रम प्रसंगी एक हजार पाचशे पेक्षा जास्त पालकांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या व्यासपीठावरूनच उद्याचे कलाकार, वृत्त निवेदक, समाजसेवक, कुशल नेतृत्व, संघटक, कुशल राजकारणी घडत असतात. जे भविष्यामध्ये आपल्या भारत देशाचे नावलौकिक वाढवतील. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी डॉ. वसंतराव चिचोले यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या व शिवसाईच्या विद्यार्थ्यांची यशोगाथा वर्तमान पत्र व सोशियल मेडियाच्या माध्यमातून नेहमीच आम्हाला माहिती मिळत असते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्थाविक संस्थेचे सचिव तथा शिवसाई परिवाराचे संस्थापक डी. एस. लहाने यांनी केले आपल्या प्रास्थाविकामध्ये संस्थेच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतच्या यशस्वी घोडदौड उपस्थितांसमोर मांडली. यामध्ये विविध स्पर्धात्मक यश जसे ३२ विद्यार्थी मधुन विद्यार्थ्यांची निवड तसेच क्रिडा क्षेत्रामध्ये खो-खो या खेळात राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी केलेले प्रतिनिधित्व धनुर्विद्या साठी खेलो इंडिया मध्ये झालेली निवड अशा विविध उल्लेखनीय कामगिरीचे उपस्थितांना माहिती दिली. स्नेहसंमेलनाच्या व्यासपीठावर प्रथम वार्षिक पुस्तक स्पर्शक मान्यवरांच्या हस्ते अनावरन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी वर्षभरामध्ये सादर केलेल्या त्यांच्या स्वताच्या कवीता, लेख, कहाण्या, चित्र, आणि बरेच काही स्पर्श या पुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आले. शिवसाईच्या दोन दिवसीय वसुधैव कुटुंबकम या वार्षिक स्नेहसंमेलनाची मागील आठ दिवसाची विद्यार्थी, शिक्षक व पालकांची मेहनत दोन दिवसीय कार्यक्रमाचे दरम्यान सादर करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिवसाई बँक स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने श्री राम मंदिर रामलल्ला प्राण प्रतिष्ठा महा सोहळा उत्साहात साजरा...

जनसंचलन/ खामगाव

संपूर्ण भारतात आज २२ जानेवारी रोजी राम दिवाळी साजरी झाली अयोध्या धाम येथे उभारण्यात आलेल्या भव्य राम मंदिरात प्रभु श्रीराम यांच्या मुर्ती ची प्राण प्रतिष्ठा महा सोहळा पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला २२ जानेवारी रोजी दुपारी पार पडलेल्या या ऐतिहासिक सुवर्ण क्षणाची सर्व जन साक्षी झाले. श्री राम लला प्राण प्रतिष्ठा सोहळ्या निमित्त अवघी खामगाव नगरी राम मय झाल्या चे मिळाले. श्री राम लला प्राण प्रतिष्ठा सोहळ्या निमित्त शहरातील सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने श्री ओंकारेश्वर मंदिर येथे आज संध्याकाळी भव्य दिव्य दीपोत्सवा व महाआरती चे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी ६ वा महाआरती करून लाडू प्रसाद वाटप करण्यात आले नंतर ५००० दिवे लावून भव्य दिव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला याप्रसंगी , वि. हिं परिषद.बजरंग दल विभागीय सह मंत्री,अमोलजी अंधारे, पवनजी गरड, लक्ष्मणराव गाडे, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा.गुरूव्दारा संचालक जितेंद्र सिंग मेहरा, मोठी देवि मंडळ संचालक रवि आनंदे, दिलीप झापर्डे, विनोद सुकाळे,अरूण कडवकर,प्रशांत आवटे, दादु अंधारे, विक्की देशमुख,लालाजी सांगळे. अशोक आनंदे.सचिन केवारे, दिलिप जोगदंड,गजानन उंबरकर, रामदास ढोले, सागर चुंबळकर, राजपाल यादव,अशोक मोरे,विनोद महाडिक, अशोक मोरे,शांताराम मंडवे,गणेश बंड, आशाबाई अंधारे. सुशिलाबाई आवलकर,पार्वता सुकाळे,जया सुकाळे,मंगला बावस्कर. शकुंतला ढवळे. जयश्री झापर्डे, संगिता देशमुख,वर्षा देशमुख,प्रमिलाबाई शिंदे, निता अंधारे, सोनाली शिंदे,निकिता पवार, अर्चना ढवळे,जान्हवी डोंगरकर,अंजली पवार,ज्योती डोंगरकर,सुनिता साळुंखे,पुजा डोंगरकर,कामिनी शिंदे,अमृता तायडे,आस्था सोळंके,वैशाली कोडलिंगे,जान्हवी शर्मा,आराध्या ढोले,ऊषा शर्मा,प्राची कोडलिंगे, किर्ती शर्मा,संगिता तायडे,मंगला सोळंके, शुभांगी विटे, मनिषा पवार, आशा दिपके, आराध्या ढवळे, अनुराधा बंड तसेच शिवाजी नगर. सतिफैल भागातील शेकडो महिला पुरूषांची उपस्थिती होती सन २००० मध्ये संस्थापक अध्यक्ष देविदास उर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांनी भजनी मंडळाची स्थापना करून आज पर्यंत अखंड पणे धार्मिक व सामाजिक उपक्रम निस्वार्थ भावनेतून सतत मुख मे हो राम नाम, राम सेवा हाथ मे हे ध्येय घेऊन सतत मंडळाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवत आहेत अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली.



# कवठळ येथे श्री राम प्राणप्रतिष्ठेचा जलोषात साजरा...

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मौजे कवठळ येथे दिनांक २२/०१/२०२४ रोजी मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला आहे मर्यादापुरुषोत्तम प्रभु श्रीराम जन्मभूमी अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रभु श्रीराम मुर्तीप्राणप्रतीष्ठा सोहळा संपन्न होत असतानां या सोहळ्यानिमित्त अयोध्येसह संपूर्ण देशात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या पाश्वभूमीवर कवठळ येथे युवासेना जिल्हा सरचिटणीस गणेश वाघमारे यांच्या संकल्पनेतून प्रभु श्रीरामांची बैलगाडा रथातुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या सोहळ्यानिमित्त कवठळ मध्ये घरोघरी रांगोळी काढुन दीपोत्सव साजरा करण्यात आला. बैलगाडा रथाला फुलांनी व केळीच्या खांबांनी सजवून त्यामध्ये प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीतामाता व रामभक्त हनुमंताच्या वेशभूषेत लहान मुलांची टाळ मृदंगाच्या गजरात गावातून दिंडी काढण्यात आली, त्यानंतर गावातील दक्षिणमुखी हनुमंताच्या मंदिरात प्रसाद वाटप करून प्रभुश्रीरामाची सामुहिक आरती घेऊन दिंडीची सांगता करण्यात आली. या वेळी पुजारी संतोष महाराज कहाडे, रमेशबुवा वाघमारे, डिगांबर कहाडे, दत्ता गावंडे, अंबादास वाघमारे, कचरूबा पडघान, ओम घुबे, यांच्यासह अनेक तरुण, महीला भाविक, व मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते .



# धोत्रा भणगोजी येथे श्रीराम मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम...



जनसंचलन/ चिखली

आयोध्येत २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त सर्व देशभरात भक्तीमय वातावरण तयार झालेले असुन चिखली तालुक्यातील धोत्रा भणगोजी येथेही अगदी सकाळपासुनच गावकरी व बंकटस्वामी भजनी मंडळाच्या वतीने गावात सकाळ पासुनच काकड आरती व टाळ मृदगाच्या गजरात ९ वाजता रेणुका मातेच्या मंदिरापासुन दिंडीला सुरूवात करून संपूर्ण गावात परिक्रमा केले. या दरम्यान गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी दिंडी सोहळ्याच्या सुरूवातीला सौ. प्रमिला अरुण भोसले, सौ. आश्विनी सुनिल भोसले यांनी सर्व उपस्थितांना कुंकू अक्षता लावून कार्यक्रमास सुरुवात झाली. या निघालेल्या दिंडी सोहळ्यात गावातील महिला, पुरुष, लहान मुले तसेच वृध्दांचीही उपस्थिती होती. गावात महिलांनी आपल्या घरासमोर रांगोळी व घरावर झंडे फडकवून भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. रेणुका मातेच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तर सायंकाळी महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास ह.भ.प. रामकृष्ण महाराज शितोळे, ह.भ.प. अशोक महाराज पवळ, वाल्मीक महाराज कोईगडे, ज्ञानेश्वर कोईगडे, अशोक शिंदे, ज्ञानेश्वर हळदे, रामकृष्ण कापसे, विश्वंभर हळदे, निवृत्ती हळदे, पुरूषोत्तम काटे यांच्यासह आदी रामभक्त यांनी सहकार्य केले.

# आवश्यकता भासल्यास जरांगेंच्या आंदोलनासाठी सरकार विशिष्ट जागा निश्चित करणार, उच्च न्यायालयात ग्वाही...

वृत्तसंस्था/मुंबई

लाखोंच्या मोर्चासह मुंबईच्या दिशेने कूच करत असलेले राठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यापासून रोखा, अशी विनंती याचिकेद्वारे करण्यात आली असली तरी मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी तसा कोणताही अंतरिम आदेश केला नाही. त्यामुळे या मोर्चाला आडकाठी नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र, ङ्खआवश्यकता भासल्यास जरांगे यांच्या नेतृत्वाखालील शांततापूर्ण आंदोलनासाठी विशिष्ट जागा निश्चित करून देऊ आणि शांततेचा भंग झाल्यास कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ते उपाय करूफ, अशी राज्य सरकारने दिलेली ग्वाही न्या. अजय गडकरी व न्या. श्याम चांडक यांच्या खंडपीठाने अंतरिम आदेशात नोंदवली.जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यापूर्वी हिंसक वळण लागल्याची उदाहरणे आहेत. आता त्यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवाली येथून सुरू केलेला मोर्चा लाखोंच्या संख्येत आहे. तो मोर्चा २६ जानेवारी रोजी मुंबईत येत आहे. परिणामी संपूर्ण मुंबई शहर ठप्प होण्याची शक्यता आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे जनजीवनही विस्कळीत होऊ शकते. चेंगराचेंगरीसारखा प्रकारही होऊ शकतो. आंदोलनाविरुद्ध कारवाई झाल्यास शेअर बाजार, मंत्रालय व चौपाट्यांना लक्ष्य करण्याची भाषा जरांगे यांनी वापरली आहे. पोलिसांची रीतसर परवानगी न मिळवताच हा मोर्चा मुंबईत येत आहे. त्यामुळे याप्रश्नी उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून अंतरिम आदेशाद्वारे मोर्चाला रोखण्यात यावेफ, असे म्हणणे मांडत उच्च न्यायालयातील वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते व सोलापूरमधील शंकर लिंगे यांनी याचिका केली आहे. त्याबाबत बुधवारी प्राथमिक सुनावणी झाली.शांततेत आंदोलनाला विरा-ेध नाही. मात्र, या मोर्चामुळे प्रचंड लोंढा मुंबईत आल्यानंतर सार्वजनिक रुग्णालये, शाळा इत्यादी प्रभावित होतील. लोकांचे जनजीवन विस्कळीत होईल. यापूर्वी जालना, नगर व पुण्यात अशी परिस्थिती उद्भवली आहे. तशीच गत मुंबईची होईल. आझाद मैदानाची क्षमताच पाच हजार व्यक्तींपुरती मर्यादित आहे. दुसरीकडे दादरमधील शिवाजी पार्कवर न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाप्रमाणे कोणत्याही प्रकारची सभा घेण्यास परव-ानगी नाही. आंदोलनांमुळे जनजीवन विस्कळीत होता कामा नये, असे सर्वोच्च न्यायालयाने अमित साहनी निवाड्यात म्हटलेले आहे. त्यामुळे हा मोर्चा मुंबईत येणे योग्य होणार नाही. तरीही विनापरवानगी येणाऱ्या या मोर्चाविरोधात सरकारकडून काही होताना दिसत नाही. सरकारमधील एक मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील मोर्चाचे समर्थन करतात, तर दुसरे मंत्री छगन भुजबळ हे विरोध दर्शवतात. यावरून या मुद्द्यावर सरकारमध्येच विभागणी झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे न्यायालयाने हस्त-क्षेप करणे गरजेचे आहे असा युक्तिवाद सदावर्ते यांनी मांडला.



तर शांततापूर्ण आंदोलनाला सरकारचा विरोध नाही. मात्र, प्रचंड प्रमाणात गर्दी येऊन पूर्ण शहर ठप्प होणार असेल तर ते अनुचित आहे. सर्वोच्च न्यायालयानेही आंदोलनांच्या संदर्भात दिशानिर्देश दिलेले आहेत. शहर ठप्प होणार नाही ना, याबाबत सरकारही चिंतेत असून संपूर्ण पोलीस दल याप्रश्नी कार्यरत आहे. परंतु, हा मोर्चा मुंबईत येण्याऐवजी मुंबईबाहेरच एखाद्या मैदानात थांबला तर योग्य होईल. अन्यथा काही अनुचित घडल्यास कोणी तरी जबाबदारीही घ्यायला हवी. शिवाय या मोर्चाबद्दल रीतसर परव-ानगीचा अर्जच आझाद मैदान पोलिस ठाण्याकडे आलेले नाही. केवळ माहितीबाबत एक पत्र ३१ डिसेंबर २०२३ रोजी आलेफ, असे म्हणणे राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मांडले.

# बुलढाणा येथील उपविभागीय अधिकारी राजेंद जाधव यांची बदली...

## पुलकीत सिंह यांची बुलढाणा उपविभागीय अधिकारी पदासाठी नियुक्ती...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालय येथील सहाय्यक जिल्हाधिकारी बुलढाणा उपविभाग अधिकारी राजेंद्र जाधव यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी पुलकीत सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई अतंर्गत दि २३ जानेवारी आदेश काढण्यात आला आहे. त्या आदेशानुसार बुलढाणा येथील उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव यांची जागी सहाय्यक जिल्हाधिकारी चांदवड उपविभाग नाशिक येथे कार्यरत अस-लेले श्री पुलकीत सिंह यांची बुलढाणा येथे सहाय्यक जिल्हाधिकारी बुलढाणा उपविभाग अधिकारी या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## पान १ वरुन भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात लोकशाही...

त्यातून शासनाचे प्रचंड नुकसान करीत असतात. हे सर्व तर बुलढाण महसूल विभागात सुरू आहेच, परंतु दुसरीकडे लोकशाहीदिनी दिलेल्या तक्रारीवरही महसूल प्रशासन ढिम्मपणे पाहत राहते आणि कोणतीहीकारवाई करीत नाही, हा खरे तर लोकशाहीचा खून करण्याचा सारखा प्रकार आहे. बुलढाणा महसूल विभाग आज भ्रष्टाचाऱ्यांसाठी आश्रयाचे नंदनवन बनले आहे. या ठिकाणी कोणीही राजरोसपणे भ्रष्टाचार करो, त्याच्यावर कारवाई केली जात नाही, असाच संदेश या संपूर्ण प्रकरणातून प्राप्त होत आहे. परंतु हा संदेश अत्यंत घातक आहे. भ्रष्टाचाराची ही वाळवी आज संपूर्ण महसूल विभागाला गिळंकृत करण्यास सज्ज झालेली आहे. ही वाळवी वेळीच नष्ट न केल्यास त्याचे गंभीर परिणाम सर्वसामान्य जनतेला यापुढील काळात भोगावी लागणार आहेत. त्यामुळे विद्यमान जिल्हाधिकारी किरण पाटील यांना यासंदर्भात आमचे आवाहन आहे की, लवकरात लवकर या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा भ्रष्टाचाराचा हा भस्मासूर आणखी विशाल होण्याची शक्यता आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आ-पला लढा सातत्याने सुरूच ठेवणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी निवड...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभाग आणि महिला बालकल्याण विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना २०२३-२४ साठी लाभार्थ्यांची गुरूवार, दि. २५ जानेवारी रोजी निवड करण्यात येणार आहे. योजनांकरीता प्राप्त झालेल्या पात्र अर्जामधून ईश्वर चिठ्ठीने लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या श्री छत्रपती शिव-ाजी महाराज सभागृहात ईश्वर चिठ्ठीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. समाज कल्याण विभागाच्या मागास-वर्गीय शेतकऱ्यासाठी एचडीईपी पाईप, मागासवर्गीय शेतकऱ्यासाठी ५ एचपी विद्युत मोटर पंप, मागास-वर्गीय महिलांसाठी शिलाई मशिन, दिव्यांग व्यक्तिकरिता मिनी पिठाची गिरणी, तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या ग्रामीण भागातील महिला व मुलींना पिठाची चक्की पुरविणे (विघयो), ग्रामीण भाग-ातील महिला व मुलींना शिलाई मशिन पुरविणे (विघयो), ग्रामीण भागातील महिला व मुलींना मिनी दाल मिल पुरविणे (विघयो), ग्रामीण भागातील




महिला व मुलींना मसाला उद्योग यंत्र पुरविणे (विघयो) या योजनांसाठी लाभार्थी निवड करण्यात येणार आहे. यावेळी लाभार्थ्यांनी उपस्थित राह-ावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

